


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे अंक : २७४ वा शुक्रवार दि. ०३ जानेवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३रुपये

# बोथेंवर फौजदारी कारवाईसाठी डॉ. भंडारी यांचे हात थरथर करताहेत का?

## प्रकाश नामदेव बोथे म्हणजे चोर...आणि वरून शिरजोर या उक्तीप्रमाणे वागणारे मुजोर व्यक्तिमत्व

**जनसंचलन/बुलढाणा**

चौकशी समितीत दोषी आढळलेल्या व तात्काळ फौजदारी कारवाईची गरज असलेल्या प्रकाश नामदेव बोथे राहणार अकोला यांच्यावर गेल्या अनेक महिन्यांपासून आरोग्य उपसंचालक अकोला डॉ. कमलेश भंडारी यांचे हात थरथरत आहेत का, असा महत्वपूर्ण प्रश्न आता उपस्थित होऊ लागला आहे. प्रकाश बोथे यांच्यावर जी विभागीय चौकशी बसवण्यात आली होती, त्या अहवालात अत्यंत गंभीर असे निष्कर्ष समोर आलेले आहेत. त्यामुळे प्रकाश नामदेव बोथे ही आरोग्य विभागाला लागलेली भ्रष्टाचाराची कीड आहे, हे सिद्ध होते. असे असताना देखील प्रकाश बोथे चौकशी समितीशी अत्यंत असहकार करीत आपली मुजोरी सिद्ध केली आहे. यानुसार एकच म्हणावेसे वाटते की, प्रकाश नामदेव बोथे हे मचोर...आणि वरून शिरजोरफ या उक्तीप्रमाणे वागणारे मुजोर व्यक्तिमत्व आहे. सन २०१९ साली भांडारपाल या पदावर शैक्षणिक पात्रता आणि बौद्धिक लायकी नसताना देखील प्रकाश बोथे हे कार्यरत झाले. अर्थात, बोथे यांना या पदावर नियुक्ती देणाऱ्या अधिकाऱ्यावर देखील गंभीर स्वरूपाची कारवाई होणे गरजेचे आहे. कारण नियमात बसत नसतानाही करण्यात आलेली ही नियुक्ती नक्कीच अर्थपूर्ण देवाणघेवाण झाल्याशिवाय झालेली नाही, हे सिद्ध आहे. भांडारपाल पदावर कार्यरत झाल्यानंतर बोथे यांनी भ्रष्टाचाराची एक अनंत अशी मालिका सुरू केली. प्रत्येक ठिकाणी भ्रष्टाचार करीत मोठ्या प्रमाणात जिल्हा रुग्णालयाला चुना लावण्याचे काम केले. प्रकाश नामदेव बोथे यांनी कशाकशात भ्रष्टाचार केला हे आम्ही कालच्या अंकात आम्ही सविस्तररित्या मांडले आहे. आता मुद्दा हा आहे की, बोथे यांची तक्रार झाल्यानंतर आणि यासंदर्भात चहूबाजूंनी दबाव आणला गेल्यानंतर अखेर बोथे यांची विभागीय चौकशी करण्यात आली. या विभागीय चौकशी दरम्यान स्वतःची बाजू मांडण्यासाठी बोथे यांना बोलावणे पाठवण्यात आले होते. परंतु भ्रष्टाचार करून करून प्रचंड माजलेल्या आणि गेंड्याच्या कातडीचे बनलेल्या बोथे यांनी चक्क पोस्टाद्वारे आलेली नोटीसदेखील स्वीकारण्याचे सौजन्य दाखवले नाही. शिवाय त्यांच्या वैयक्तिक फोन नंबरवर संपर्क केला असता, मी आजारी असल्याचे त्यांनी कळवले. यावरून हे स्पष्ट आहे की, प्रकाश बोथे हे मचोर... आणि वरून शिरजोरफ या उक्तीप्रमाणे वागणारे मुजोर व्यक्तिमत्व आहे. प्रकाश नामदेव बोथे यांच्या या नालायक कृतीमुळे अखेर चौकशी समितीने त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस आपल्या अहवालात केली. खरे तर सुमारे पाच महिन्यांपूर्वी हा अहवाल आरोग्य उपसंचालक अकोला यांना पाठवण्यात आलेला आहे. परंतु आरोग्य उपसंचालक अकोला डॉ. कमलेश भंडारी यांनी हा अहवाल धूळखात ठेवला आहे. अत्यंत बेशरमपणे आणि बेदरकारपणे भ्रष्टाचार करणारा, शासनाला कोट्यवधी रुपयांचा चुना लावणाऱ्या आणि लायकी नसतानाही पदावर असणाऱ्या अधिकाऱ्याच्या विरोधात तात्काळ कारवाई होणे गरजेचे आहे. परंतु डॉ. भंडारी हे नेमके कशासाठी टाळाटाळ करीत आहेत, हे अद्यापही कोणाच्या लक्षात आलेले नाही. डॉ. भंडारी यांनी कारवाई न करण्याचे कारण नेमके काय, हे खरे तर जनतेला कळणे गरजेचे आहे. यासंदर्भात सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने डॉ. भंडारी यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु डॉ. भंडारी हे माहिती देण्यापासून आणि पत्रकारांच्या प्रश्नांपासून अक्षरशः पळ काढताना दिसून येत आहेत. प्रकाश बोथे यांच्यावर फौजदारी कारवाई केली, तर आरोग्य विभागावर नेमके असे कोणते आकाश येऊन कोसळणार आहे, हा न कळण्यापलिकडे गेलेला विषय आहे. कदाचित बोथे हे आपल्याच अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल तर करीत नाहीत ना, असाही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. बोथे हे जर अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करीत असतील, तर यामध्ये कोणाकोणाचे पितळ उघडे पडणार आहे, हाही मोठा प्रश्न आहे. त्यामुळे डॉ. भंडारी यांना आमचे आवाहन आहे की, तुम्ही तात्काळ अशा भ्रष्टाचारी व नालायक अधिकाऱ्यावर कारवाई करावी. अन्यथा तुमचा ढिसाळपणा आणि तुमचा निष्क्रियपणा सिद्ध होईल. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज भ्रष्टाचार करणारे आणि भ्रष्टाचाऱ्यांना वाचवणाऱ्या कोण्याही अधिकाऱ्याची गय करीत नाही. जोपर्यंत प्रकाश नामदेव बोथे सारख्या नालायक, निर्लज्ज, भ्रष्टाचारी आणि बदमाश अधिकाऱ्याला गजाआड केले जात नाही, तोपर्यंत या विषयाचा पाठपुरावा करीतच राहणार आहे.




अजून बरेच काही पुढील भागात...

## विवाहितेचा केला विनयभंग दोन गटांत तुफान झाला राडा...

**जनसंचलन/ चिखली**

विवाहितेचा विनयभंग केल्याच्या कारणावरून दोन गटात वाद झाल्याची घटना ३१ डिसेंबरच्या रात्री १० वाजताच्या सुमारास घडली. या घटनेदरम्यान दगडफेकसुद्धा झाली. पोलिसांनी वेळीच घटनास्थळी दाखल होत परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. या प्रकरणी परस्परविरोधी तक्रारीवरून गुन्हे दाखल करण्यात आले. याप्रकरणी पीडित महिलेने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, - गोरक्षणवाडीतील शेख सोहेल शेख - अफसर याने अश्लील इशारे करण्यासह महिलेच्या लज्जेस बाधा पोहोचेल, अशी कृती केली. त्यास विरोध केला असता त्याने मारहाण करून वाच्यता केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. पीडितेचा पती समजाविण्यास गेला असता त्यासही शेख सोहेल शेख अफसर, शेख फैजान व मोहम्मद रजा या तिघांनी धक्काबुक्की, शिविगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत नमूद आहे. त्यावरून पोलिसांनी शेख सोहेल शेख अफसर, शेख फैजान व मोहम्मद रजा या तिघांविरुद्ध कलम ७५, ७८, ७९, ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३ (५) बीएनएसनुसार गुन्हा दाखल केला आहे. दुसऱ्या गटाकडून शेख जाफर शेख कासम (रा. गोरक्षणवाडी, चिखली) यांनीही पोलिसांत तक्रार दिली. त्यामध्ये आनंद नगरमधील हरी पवार, पवन सुरडकर, पिंटू सुरुशे या तिघांनी पत्नीला मोबाइल नंबर का मागितला या कारणावरून काठी, लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यावरून पोलिसांनी हरी पवार, पवन सुरडकर व पिंटू सुरुशे या तिघांविरुद्ध कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३ (५) बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. दरम्यान, या घटनेमुळे या भागात दगडफेकीचाही प्रकार घडला होता. त्यामुळे काही काळ किरकोळ तणावही निर्माण झाला होता.

# ३१ वर्ष सेवा बजावलेल्या महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाचे मुख्याध्यापक मोहन जैस्वाल यांचा सेवापूर्ती सोहळा..

जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा तालुक्यातील नांद्राकोळी येथील महात्मा ज्योतिबा फुले,विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय येथे कार्यरत असलेले मुख्याध्यापक श्री मोहन रामदिन जैस्वाल यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे नांद्राकोळी येथील आजी माजी विद्यार्थ्यांनी केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांद्राकोळी चे माजी सरपंच श्रीरामबाबा हुडेकर हे हो-ते तर विशेष सत्कार सेवा निवृत्त मुख्याध्यापक प्रकाश वानेरे आणि शिक्षक खुशालराव गायकवाड यांचा करण्यात आला.. पंचायत समिती चे उपसभापती विठ्ठलभाऊ तायडे,सरपंच आशा सं .काळवाघे यांची विशेष उपस्थिती होती.. १५ जुलै १९९३ रोजी रुजू झालेले नेहमी हसतमुख आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व ज्यांनी ३१ वर्ष आपली सेवा दिली अशा मुख्याध्यापक मोहन जैस्वाल यांचा यथोचित सत्कार करून गौरव करून त्यांना भेटवस्तू देऊन सेव-ापूर्ती सोहळा नांद्राकोळी येथील हनुमान मंदिर परिसरात करण्यात आला आहे. यावेळी मा.सरपंच संजय काळवाघे , केंद्रप्रमुख विक्रम म्हस्के, समाधान जाधव, सुरेश पंढरी का.कडूबा हिवाळे, यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी जाकीर शहा, दलितमित्र माधवराव हुडेकर, श्रीराम हुडेकर,मुख्याध्यापक भोजराज तोत्रे, अशोकराव काळवाघे कृउबास मा सभापती,श्रीकृष्णभाऊ काळवाघे, पुंजाजी बीके,दामोधर अण्णा,श्रीराम जाधव,बबन उबाळे, बाबुराव राऊत,संजय सं.काळवाघे,भास्कर हुडेकर,जाकिर शाह,जोमाळकर सर, गवते सर,स्वप्निल काळवाघे सर, ग्रामविकास अधिकारी योगेश नागपुरे,गजानन राऊत,अनिल राऊत, गजानन धाडे,अमोल इंगळे,आकाश हुडेकर, शुभम हुडेकर, हिवाळे सर,



राऊत सर, भानुदास उबरहंडे,हुडेकर सर,जी एम काळवाघे ,,सुरेश राऊत, दौड सर, दोडे मामा,पंढरी काळवाघे ,विजय काळवाघे,राजू काळवाघे,,संदीप काळवाघे,ज्ञानेश्वर काळवाघे ,प्रमोद कड ,अमृता राऊत,विजय ज्ञा.काळवाघे, गजु काळवाघे,नाना राऊत,सुनील राऊत, सुरेश राऊत,प्रशांत राऊत, प्रमोद राऊत,दगडुबा राऊत,अशोक हुडेकर, रामु उबरहंडे यासह शाळेतील आजी माजी विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि नागरिकांची उपस्थिती होती..प्रास्ताविक संजय काळवाघे यांनी केले सूत्रसंचालन भानुदास हुडेकर तसेच मनोज उबाळे यांनी सर्व उपस्थीतांचे आभार मानले.

# व्यायाम शाळेला स्वतंत्र रस्त्याची मागणीसाठी युवाकांचे पालिकेत ठिय्या आंदोलन!

जनसंचलन/बुलढाणा

मिर्झा नगर येथे हाजी सैयद उस्मान सैयद मन्नू डोंगरे नगर परिषद उर्दू शाळा क्रमांक २ मध्ये असलेली व्यायाम शाळा येथे जाणयासाठी स्वतंत्र रास्ता करुन देण्याची मागणीसाठी अल मदिना फाउंडेशनचे अध्यक्ष नदीम शेख यांच्या नेतृत्वात आज गुरुवारी २ जानेवारी रोजी बुलडाणा नगर परिषदेसमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. शहरातील मिर्झा नगरात उर्दू शाळेत नगरपरिषद प्रशासनाच्या वतीने दोन- तीन वर्षापूर्वी व्यायाम शाळा बांधण्यात आली होती. मात्र या व्यायाम शाळेत जाण्यासाठी रस्ताच नसल्याने तरुणांना भिंतीवरून उडी मारून जावे लागत आहे. त्यामुळे व्यायाम शाळेत जाण्यासाठी स्वतंत्र रस्ता करून देण्यात यावा अशी मागणी नदीम शेख यांनी नगरपरिषद प्रशासनाकडे केली होती. प्रशासनाने वेळेवर दखल ना घेतल्याने अल मदिना फाउंडेशनच्या वतीने आज ठिय्या



आंदोलन मांडण्यात आला. यावेळी नगरपरिषद प्रशासनाच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली.अखेर पोलीस प्रशासनाने मध्यस्थी करून आंदोलकांची नगरपरिषद प्रशासनासोबत चर्चा घडवून आणली. आपल्या समस्या शक्य तितक्या लवकर व तातडीने सोडवण्यात येईल असा शब्द दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यासह परिसरातील इतर समस्यांबद्दलही नगरपरिषद प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. बंद पडलेल्या कमेल्यामधील डुकरांचा बंदोबस्त करावा , कमेला परिसरात दररोज घंटागाडी पाठवावी या मागण्याही प्रशासनाकडे करण्यात आल्या. अखेर या समस्या तात्काळ मार्गी लावण्याचा शब्द मुख्याधिकाऱ्यांनी दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी शेख अन्सार, अली नवाज़, वसीम खान, शेख जुनैद, मो. फरहान, इरफान शाह, एजाज खान, बबलू खान, शानू मेंबर, मो. शाहेद, शेख साजिद, अरबाज खान, अकील खान, जावेद खान, निसार खान, एसके शरीम, शेख सलमान, नाझिम खान, शाहरुख खान, शोएब बागवान, नसीम खान, आलियान खान आदि तरुण उपस्थित होते

# लवकरच पत्रकारांच्या व्यापक आरोग्य शिबीराचे आयोजन...

## केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाला आश्वासन



जनसंचलन/बुलढाणा

मराठी पत्रकार परिषद संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या नवीन कार्यकारिणीचा केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रता-पराव जाधव यांनी सहृदय सत्कार केला. यावेळी बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष रणजीतसिंग राजपूत यांनी पत्रकारांसाठी व्यापक स्तरावर आरोग्य शिबीराची मागणी केली. या मागणीला तात्काळ होकार देत केंद्रीय मंत्री ना. जाधव यांनी लवकरच यासाठी आयुष मंत्रालय पुढाकार घेईल आणि पत्रकारांसाठी सर्वदायी आरोग्य शिबीर आयोजित करू, असे आश्वस्त केले. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात असलेल्या खासदार यांच्या कार्यालयात हा सत्कार समारोह पार पडला. बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाच्या नवीन कार्यकारिणीचे नुकतेच गठन करण्यात आले आहे. यात जिल्हाध्यक्ष म्हणून रणजीतसिंग राजपूत यांची अविरोध निवड झाली. दिल्लीत असल्यामुळे केंद्रीय मंत्री ना. जाधव यांनी मोबाईलवरून कार्यकारिणीचे अभिनंदन केले होते. आज, बुलढाणा येथे दौर्यावर आल्यानंतर केंद्रीय मंत्रीमहोदयांनी जिल्हाध्यक्ष रणजीतसिंग राजपूत तसेच सरचिटणीस कासिम शेख, कार्याध्यक्ष वसीम शेख, सहसचिव शिवाजी मामलकर, महिला सेल जिल्हाध्यक्ष कु. मृणाल सावळे, सोशल मिडीया प्रमुख संजय जाधव यांचा शॉल, श्रीफळ तसेच फेटा नेसवून सत्कार केला. याशिवाय मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यउपाध्यक्षपदी चंद्रकांत बर्दे यांची आणि अधिस्वीकृती परिषदेच्या सदस्यपदी राजेंद्र काळे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. पत्रकार प्रा. युवराज वाघ यांनी सत्कार सोहळ्याचे संचलन करीत केंद्रीय मंत्र्यांना नवीन कार्यकारिणीचा परिचय दिला. यावेळी केंद्रीय मंत्री यांचे स्वीय सहाय्यक डॉ. गोपाल डिके, चंद्रकांत काटकर, पत्रकार सर्वश्री विश्वास पाटील, गजानन काळुसे, श्रीमती सुरेखा सोमनाथ सावळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



# ऑन दि स्पॉट तक्रारीचा निपटारा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांचा पुढाकार!

**जनसंचलन/बुलढाणा**

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव हे आज बुलडाणा दौऱ्यावर आले असता त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील त्यांच्या जनसंपर्क बसुन लोकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या व संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करून नागरिकांचे प्रश्न मार्गी लावले. बुलढाणा लोकसभा मतदारसंघातील मतदारांना येणाऱ्या अडचणी संदर्भात त्यांनी थेट संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधून तक्रारींचा ऑन द स्पॉट निपटारा केला त्यानंतर माध्यम प्रतिनिधीशी औपचारिक चर्चा करताना असतांना ते म्हणाले की उद्धव ठाकरे यांची शिवसेना संपवण्याची खासदार संजय राऊत यांनी मनोमन जी प्रतिज्ञा केली होती त्यामध्ये त्यांना मोठ्या प्रमाणात यश आले आहे, अशी टीका केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी



संजय राऊत यांच्यावर केली आहे.. पवार कुटुंबियांचे राजकारणामध्ये दिशा आणि विचार जरी वेगळे असले तरी ते आजपर्यंत कौटुंबिक संबंध जोपासत आले आहेत, अनेक कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये ते एकत्र येत असतात, त्यामुळे घरातील ज्येष्ठ आणि २ कुटुंबप्रमुख म्हणून पवार कुटुंब एकत्र यावं यासाठी आशाताई पवार यांनी विठ्ठलाला साकडं घातलं असेल तर त्याचा विचार शरद पवार आणि अजित पवार करतील असे ते म्हणाले गेल्या यावेळी मंत्र्यांची संख्या कमी होती यावेळी ती वाढली आहे, येत्या दोन दिवसात सर्वमंत्री आपला पदभार स्वीकारतील आणि पालकमंत्रीपद जाहीर होतील असेही त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलं

# जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी घेतला हा निर्णय!

**जनसंचलन/बुलढाणा**

नवीन वर्ष २०२५ मध्ये जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी ३ स्थानिक सुट्ट्या घोषित केल्या आहेत.२० फेब्रुवारी गजानन महाराज प्रकट दिन,३० एप्रिल अक्षय तृतीया आणिएक सप्टेंबर २०२५ रोजी ज्येष्ठा गौरी पूजनानिमित्त जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक सुट्टी घोषित केली आहे.हा आदेश जिल्ह्यातील दिवाणी फौजदारी न्यायालय व अधिकोष यांना लागू होणार नाही. नवीन वर्ष लवकरच येत आहे. या निमित्ताने अनेकांना पुढच्या वर्षी किती सुट्ट्या मिळणार हे पाहण्याची उत्सुकता असते, नवीन वर्षाचे कॅलेंडर आले की सर्वात



आधी आपण गणपती, दिवाळी, वाढदिवस, असे महत्त्वाचे सण हे सगळ्यात पहिल्यांदा पाह-तो. तर यंदा २०२५ मध्ये गुढी पाडवा, रामनवमी, मोहरम आणि प्रजासत्ताक दिन यांसारखे सण रविवारी येणार आहेत.अशात जिल्हाधिकारी यांनी स्थानिक ३ सुट्ट्या एक जानेवारीला नवीन वर्षी बुलढाणा जिल्ह्यासाठी जाहीर केल्या आहेत.

# जालना येथील अपघातात बुलढाण्याचे चार ठार!

**जनसंचलन/बुलढाणा**

नवीन वर्षाची सुरुवात अपघाताने होत आहे की काय? या विच-ारानेच उरात धडकी भरत आहे. देवदर्शनासाठी गेलेल्या भाविकांचा अपघात झाला आहे.जालन्यातील अपघातात बुलढाण्याचे चौघे ठार झाल्याने बुलढाण्यात हळहळ व्यक्त होतेय.रस्त्यावर थांबलेल्या ट्रकला कारची मागून धडक लागल्याने मोठा अपघात झाला.या अपघातात जिल्ह्यातील शेलगाव देशमुख येथील चौघे ठार झालेत. सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावरील महाकाळ शिवारात ही घटना घडली. अपघातातील मृत्यू झालेल्या



व्यक्तीसह मुलगा मुलगी आणि चुलत बहीण हे पंढरपूर कोल्हापूर तुळजापूर येथे देवदर्शनासाठी गेले होते.देवदर्शन केले आणि परत निघताना, नियतीने डाव साधला.यामध्ये भागवत यशवंत चौरे,सृष्टी भागवत चौरे, वेदांत चौरे (अंबड जिल्हा जालना),अनिता परसराम कुटे(संभाजीनगर) असे मृतकांची नाव आहे.

# ७ टन गवताला आग लागली...


## जयश्रीताई शेळकेंनी केली पहाणी!

**जनसंचलन/बुलढाणा**

विधानसभा निवडणुकीच्या जय पराजयामुळे आग ही आग अशी परिस्थिती आहे.अशातच सिंदखेड तालुका मोताळा येथे मीयावाकी पद्धतीने २१०० विविध प्रकारच्या औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आलेल्या जंगलात आग लागली आणि वृक्षांच्या मुळाशी आच्छादनासाठी ७ टन गवताला आग लागली. यावेळी मोठे नुकसान झाले. दरम्यान महाविकास आघाडीच्या जयश्री शेळके यांनी घटनास्थळी भेट दिली आणि पाहणी केली. मियावाकी ही मानवनिर्मित जंगल पद्धती असून यामध्ये परिसंस्था अभियांत्रिकेद्वारे कमीत कमी जागेत जास्तीत जास्त देशी वृक्षांची लागवड केली जाते. मियावकी वृक्ष लागवडीत त्यांचे कूळ, जाती, प्रजातीची त्यांचे आपआपसातील अंतर आणि जमिनीखालून होण-ारी मूलद्रव्यांची देवाणघेवाण यास जास्त महत्त्व असते आणि हाच मुख्य फरक पारंपरिक वृक्ष लागवड आणि मियावाकी पद्धतीत आहे. येथे विदेशी वृक्षांना स्थान नसते. सर्व तंत्रज्ञान जमिनीखालील उपयोगी जिवाणू, खेळती हवा, शेणखत आणि भाताच्या तुसावर अवलंबून असते. याप्रकरणी जयश्री शेळके यांनी भेट दिल्यानंतर आज धा. बढे पोलीस स्टेशनंचे ठाणेदार नागेश जायले व त्यांचे



सहकारी येऊन पाहणी करून पंचनामा केला. दोषी असेल त्याच्यावर योग्य ती कार्यवाही केल्या जाईल असे आश्व-ासन दिले. दरम्यान आग लावली की लावण्यात आली? हा प्रश्न चर्चेत आहे.






# कारागृहातील बंद्यांकरिता ई-मुलाखत सुविधा नातेवाईक, वकीलांनी ऑनलाईन सुविधेचा लाभ घेण्याचा आवाहन...

**जनसंचलन/बुलढाणा**

बंदी कारागृहात दाखल झाल्यानंतर त्याचा बाहेरील जगाशी व नातेवाईक यांचेशी संपर्क तुटून जातो. बंद्यांच्या नातेवाईकासोबत संपर्क साधता यावा, यासाठी बुलढाणा कारागृहामार्फत नातेवाईक व वकील यांना व्हर्चुअल पद्धतीने घरुनच मोबाईलचा वापर करून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे घरबसल्या भेट घेण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. या ई-मुलाखत सुविधेचा लाभ बुलढाणा जिल्हा कारागृहात बंदीस्त असलेल्या बंद्यांच्या नातेवाईकांनी तसेच वकीलांनी घ्यावा, असे आवाहन बुलढाणा जिल्हा कारागृहाचे अधीक्षक संदीप भुतेकर यांनी केलेले आहे. कारागृहात दाखल झालेल्या बंद्यासाठी त्यांच्या नातेवाइकांसोबत संपर्क साधण्यासाठी कारागृह प्रशासनाकडून वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. त्यापैकीच एक म्हणजे मुलाखत सुविधा. यामध्ये बंद्याचे नातेवाईक व वकील यांना कारागृहात प्रत्यक्ष मुलाखत घेता येते. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात कारागृह विभागानेसुद्धा माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन कारागृहात बंद्याचे नातेवाईक व वकील यांना व्हर्चुअल पद्धतीने घरुनच मोबाईलचा वापर करून व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. बुलढाणा जिल्हा कारागृहातील बंद्यांना त्यांचे नातेवाईक व वकील यांचेकरीता भेटीसाठी कारागृहात दोन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग संच उपलब्ध असून आवश्यकतेनुसार व्हीसी संचांची संख्या वाढविण्यात येणार आहे. यापुर्वी बंद्यांचे कारागृहातील प्रत्यक्ष मुलाखतीकरीता चार खिडक्या उपलब्ध होत्या. आता जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून नव्याने मुलाखत कक्ष बांधण्यात आलेला असून यात १० खिडक्यांद्वारे बंदी त्यांचे नातेवाईक व वकील यांचेशी प्रत्यक्ष भेट घेऊ शकतात. तसेच कारागृह प्रशासनाकडून बंद्यासाठी दूरध्वनी सुविधाही उपलब्ध करून देण्यात आले असून बंद्यांच्या नातेवाईकांचे व्हेरीफाईड मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात. कारागृहात असलेले विदेशी बंदी, कारागृहातील भारतीय बंदी ज्यांचे नातेवाईक विदेशात राहतात त्यांच्यासह सर्व बंद्यांना या सुविधेचा लाभ मिळतो. सद्यस्थितीत पाकीस्तानी बंद्यांना हि सुविधा लागू नाही. नातेवाईक व वकील हे NPIP (www.eprisons.nic.in/npip)या पोर्टलवरुन स्वतःची व बंद्याची माहिती नमुद करुन कारागृहाला व्हीसी भेटीसाठी ऑनलाईन विनंती करु शकतात. पात्र नातेवाईक व वकील यांना कारागृहाकडून व्हीसी मुलाखतीला मान्यता मिळाल्यानंतर त्यांच्या नमुद ई-मेलवर व्हीसी भेटीची वेळ व दिनांक निश्चीत केल्यानंतर बंद्याला कारागृहातून व्हीसीद्वारे उपस्थित ठेऊन बंदी व त्याचे नातेवाईक, वकील यांच्याशी ई-मुलाखत केली जाते. व्हीसी मुलाखतीमुळे बंद्याचे नातेवाईक व वकील यांचे वेळ, श्रम व पैशाची बचत होणार आहे. आजारी व वयस्कर नातेवाईक तसेच लहान मुले यांना प्रत्यक्ष मुलाखतीस येण्याची दगदग न होता घरबसल्या मुलाखत घेणे शक्य होईल. जिल्हा, परराज्यातील किंवा विदेशातील नातेवाईक यांना घरुन मुलाखत घेता येत असल्यामुळे त्यांचा होणारा त्रास कमी होणार आहे. तसेच प्रत्यक्ष कारागृहात मुलाखतीकरीता येणारे नातेवाईक व वकील यांची संख्या कमी होऊन प्रशासनाला मदत होणार आहे. ई-मुलाखत सुविधेचा जास्तीत जास्त वापर व्हावा या करीता कारागृह प्रशासनाकडून जनजागृती करण्यात येत आहे. यासाठी कारागृह परीसरात व मुलाखत नावनोंदणी कक्षाजवळ माहितीफलक लावण्यात आले आहेत. कारागृह अधीक्षकांच्या साप्ताहीक संचार फेरीदरम्यान सुद्धा बंद्यांना सदर सुविधेची माहिती देऊन नातेवाईक व वकीलांसोबत संवाद साधण्यासाठी प्रेरित करण्यात येत आहे.

# जिल्हा ग्रंथालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाचे उद्घाटन

**जनसंचलन/बुलढाणा**



जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथे ङ्गवाचन संकल्प महाराष्ट्राचाफ या शासनाच्या अभिनव उपक्रमाअंतर्गत भव्य ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनात अमूल्य वाचनीय ग्रंथांची मेजवानी वाचकांसाठी उपलब्ध असून या ग्रंथ प्रदर्शनाचा जास्तीत जास्त वाचनप्रेमी, विद्यार्थी यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन उपस्थित मान्यवरांनी केले. या कार्यक्रमाला प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड, अप्पर कोषागार अधिकारी बबन इटे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील पाटील, मॉडेल डिग्री कॉलेजचे प्राचार्य डॉ.अण्णासाहेब म्हळसने, जिल्हा ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष डॉ. की.वा. वाघ, माहिती सहायक सतीश बगमारे, जिल्हा कोषागार कार्यालयाचे सहायक लेखाधिकारी श्याम जाधव तसेच मोठ्या प्रमाणात वाचक, स्पर्धा परीक्षा विद्यार्थी, शासनमान्य ग्रंथालयांचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. अलिकडच्या काळात देशाची तरूण पिढी वाचन संस्कृतीपासुन दुरावत असल्याचे दिसत आहे. या पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाकडे आकर्षित करण्यासाठी दि. १ ते १५ जानेवारी या कालावधीत ङ्गवाचन संकल्प महाराष्ट्राचाफ उपक्रम राबविण्यात येत आहे. या अभिनव उपक्रमांतर्गत जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय येथे ग्रंथप्रदर्शन, सामुहिक वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा, वाचन संवाद, पुस्तक परीक्षण व कथन अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांमध्येही वाचन पंधरवडा राबविण्यात येणार आहे. जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे सुमारे १ लक्ष ६० हजार ग्रंथसंपदा उपलब्ध असून त्यामध्ये मराठी, इंग्रजी व हिंदी भाषेतील विविधांगी कथासंग्रह, कादंबरी, संदर्भग्रंथ, ललित वाङ:मय, स्पर्धा परीक्षा ग्रंथ इत्यादी ग्रंथसंपदा उपलब्ध असून वाचन संकल्प महाराष्ट्राचा या उपक्रमामध्ये जास्तीतजास्त वाचकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनील पाटील यांनी केले आहे.

# दोन मुलांच्या बापाने अल्पवयीन मुलीस पळविले!

**जनसंचलन/ डोणगाव**

येथील पोलिस ठाण्यांतर्गत त असलेल्या एका गावातील नल्पवयीन मुलीस पळवून नेत दोन मुलांचा बाप असलेल्या एकाने नेच्यासोबत शारीरिक संबंध वल्याप्रकरणी वाशिम जिल्ह्यातील बावली येथील अमोल विजय लोखंडे बास डोणगाव पोलिसांनी ३१ डिसेंबर ०२४ रोजी अटक केली. त्यास न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. वाशिम जिल्ह्यातील रिसोड बालुक्यातील नावली येथील अमोल विजय लोखंडे याने ७ डिसेंबर रोजी १७ वर्षीय अल्पवयीन मुलीस लग्नाचे नामिष दाखवून पळवून नेले होते. व्यानंतर नाशिक येथे या मुलीवर त्याने नेच्या मनाविरुद्ध शारीरिक संबंध वले होते. या प्रकरणी पीडित मुलीच्या आईने क्रार दिल्यावरून पोलिसांनी आरोपी विरोधात कलम १३७ (२) भा. न्या. सं. मुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय संदीप सावळे व पोलिस कर्मचाऱ्यांच्या पथकाने आरोपीचा शोध सुरू केला होता. अल्पवयीन मुलगी व आरोपी हे वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील शिरपूर येथे आल्याची माहिती या पथकास मिळाली होती. त्यानुषंगाने दि. ३१ डिसेंबर रोजी पीएसआय संदीप सावळे व पथकाने आरोपी व अल्पवयीन मुलीस डोणगाव येथे आणत चौकशी केली. त्यात लग्नाचे आमिष दाखवत अल्पवयीन मुलीसोबत आरोपीने वारंवार शारीरिक संबंध ठेवल्याचे चौकशीत समोर आले. त्यावरून आरोपीस अटक करत त्याच्या विरोधात पोक्सो कायद्यासह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

# जुगार अड्ड्यावर हाणामारी एक गंभीर...

**जनसंचलन/ नांदुरा**



शहरापासून काही अंतरावर राष्ट्रीय महामार्गावर गत अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर सोमवारी मध्यरात्री हाणामारी झाली. या घटनेत एक जण गंभीर जखमी झाल्याने त्याच्यावर प्रथम नांदुरा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करून त्याला खामगाव येथे हलविण्यात आले. याप्रकरणी नांदुरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. मात्र प्रकरण जलंब पोलिस ठाण्याच्या हद्दीतील असल्याने तक्रार चौकशीत ठेवण्यात आली. शहरापासून काही अंतरावर राष्ट्रीय महामार्गावर नांदुरा शहरातील काहींनी जुगार अड्डा सुरू केला आहे. अड्डा जलंब पोलिस ठाण्याच्या हद्दीत असल्याने गत अनेक महिन्यांपासून सुरू आहे. अड्यावर सोमवारी मध्यरात्री नांदुरा शहरातील काही जुगाऱ्यांमधे हाणामारी झाली. आर्थिक व्यवहारावरून हा वाद झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. या हाणामारीत अंबादास बासोडे हा तरुण गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी खामगाव येथे हलविण्यात आले. घटनेनंतर याप्रकरणी नांदुरा पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली. फिर्यादी अंबादास बासोडे याच्यावर जुगार अड्ड्याच्या मालकांनी तक्रार न देण्यासाठी आधी दबाव आणला. मात्र, तो ठाम राहिल्याने जुगार अड्याच्या मालकांनी त्याची मनधरणी करीत घटनास्थळ दुसरे दाखविण्याची विनंती केली. त्यामुळे तक्रार देताना प्रत्यक्षात घटना जुगार अड्ड्यावर घडली असतानाही घटनास्थळ दुसरेच तेही नांदुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत दाखविण्यात आल्याची माहिती सुत्रांकडून प्राप्त झाली आहे. ही बाब नांदुरा पोलिसांचा लक्षात येताच त्यांनी याप्रकरणी सावध भूमिका घेत गुन्हा दाखल न करता प्रकरण चौकशीत ठेवले. गुन्हे शोध पथकाचे प्रमुख मिलिंद जवंजाळ प्रकरणाचा तपास करीत आहेत.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958